Maharashtra Times, Wednesday, 7th March, 2011

# डॉ. जयंत नारळीकर यांना महाराष्ट्रभूषण पुरस्कार

**मुंबई, ७ मार्च / खास प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'महाराष्ट्र भूषण' या सर्वोच्च पुरस्कारासाठी ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्या नावाची आज घोषणा करण्यात आली.

पाच लाख रुपये रोख, शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. राज्यातील क्रीडा, कला, साहित्य, विज्ञान, आरोग्य सेवा, सामाजिक प्रबोधन, पत्रकारिता, लोकप्रशासन या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला महाराष्ट्र भूषण पुरस्काराने १९९७ पासून गौरविण्यात येते. डॉ. नारळीकर यांना २०१० या वर्षाचा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार देण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केली. डॉ. नारळीकर यांनी गेली ४० वर्षे अंतरिक्षविज्ञान या क्षेत्रात केलेले संशोधन आणि सामान्य माणसाला खगोलशास्त्र समजावे म्हणून मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांमध्ये विज्ञान साहित्य आणि कथा निर्मिती केली आहे. केंद्र सरकारने त्यांना पद्मभूषण आणि पद्मविभूषण या पुरस्काराने गौरविले आहे. युनेस्कोने त्यांना कलिंगा हा पुरस्कार देऊन गौरविले होते.



मी १९७२ साली परदेशातून भारतात परतलो. त्यानंतर पुण्यात स्थायिक होऊन गेली ३८/३९ वर्षे विज्ञान संशोधनाचे काम करत आहे. त्याची दखल घेऊन राज्य शासनाकडून कौतुक झाले याचे समाधान वाटते. या पुरस्कारमुळे पुढील काम करण्यास अधिक हुरूप येईल. प्रत्यक्ष संशोधनाचे कार्य व सर्वसामान्यांपर्यंत विज्ञान पोहोचविण्याचे काम अधिक वेगाने करत राहीन.

”